


दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे




वर्ष ५ ▪ अंक १८२ ▪ मंगळवार ७ एप्रिल २०२६ ▪ पाने ४ ▪ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## बाजारपेठेत अतिक्रमणांवर लगाम

**बेशिस्त वाहनांवर धडक कारवाईचा इशारा । महापालिका व शहर वाहतूक शाखेची संयुक्त मोहीम**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहराच्या मुख्य बाजारपेठेतील वाढत्या वाहतूक कोंडीला आळा घालण्यासाठी महानगरपालिका आणि शहर वाहतूक शाखा ॲक्शन मोडमध्ये आली असून, अतिक्रमणधारक व बेशिस्त वाहनचालकांवर कडक कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. ६ एप्रिल रोजी सायंकाळी संयुक्तपणे राबवलेल्या मोहिमेदरम्यान संबंधितांना समज देत नोटिसा बजावण्यात आल्या असून, उद्यापासून कोणतीही तडजोड न करता थेट जप्तीची कारवाई केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

शहरातील मुख्य बाजारपेठेत रस्त्यावर केलेली अतिक्रमणे, दुकानाबाहेर ठेवलेले साहित्य, तसेच बेशिस्त पार्किंग यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेने 'नो पार्किंग' आणि 'नो हॉकर्स' झोन प्रस्तावित करत शिस्त लावण्याचा निर्धार केला आहे. मोहिमेदरम्यान महापालिकेचे वाहन जप्ती पथक व पोलिसांनी बाजारपेठेत फेरी मारत दुकानदार, हातगाडी विक्रेते आणि वाहनचालकांना नियमांचे पालन करण्याच्या सूचना दिल्या.

रस्त्यावर अडथळा ठरणारे फलक, पुतळे आणि इतर साहित्य तात्काळ हटवण्याचे आदेश देण्यात आले असून, यापुढे नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. काही ठिकाणी 'पे अँड पार्क' योजना राबवण्याचाही निर्णय घेण्यात आला असून, वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार आहे. या कारवाईमुळे बाजारपेठेतील रस्ते मोकळे होऊन नागरिकांचा प्रवास अधिक सुलभ आणि सुरक्षित होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## नेवाशात दहशत करणारी तीनजणांची टोळी तडीपार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**प नेवासा परिसरात दहशत निर्माण करणा–या तीनजणांच्या टोळीला तीन महिन्यांकरिता तडीपार करण्यात आले आहे. टोळीप्रमुख शुभम विश्वास उर्फ विश्वनाथ गर्जे (वय २९ वर्षे, रा. वडुले,ता. नेवासा), टोळी सदस्य आकाश उर्फ दत्तू उर्फ दत्ता उर्फ दत्तात्रय मच्छिंद्र सावंत (वय २५),व योगेश मच्छिंद्र सावंत (वय २८, दोघे रा. चिलेखनवाडी,ता. नेवासा) अशी त्यांची नावे आहेत.



नेवासा तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांमध्ये दहशत तयार करण्याकरिता गैरकायदयाची मंडळी जमवून गंभीर दुखापत करणे, अश्लील कृती करुन शिवीगाळ दमदाटी करणे, दरोडा टाकणे, अग्नीशस्त्रासह खुनाचा प्रयत्न करणे, गुंगीकारक पदार्थांची विक्री करणे, अग्नीशस्त्र व घातक शस्त्राने शिवीगाळ दमदाटी असे सराईतपणे केलेले ९ गुन्हे या टोळीच्या नावावर असून, त्यांची गुंडगिरी दिवसेंदिवस वाढत चालली होती. पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५५ नुसार दोन वर्षांकरिता जिल्ह्यातून तडीपारीचा प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार नुकतेच या टोळीला तीन महिन्यांसाठी तडीपार करण्यात आले आहे.

## गावठी कट्टा बाळगणारा जेरबंद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बेलवंडी (ता. श्रीगोंदा) पोलिसांनी गावठी कट्टा व चार जीवंत काडतुसे, तलवार बाळगल्या प्रकरणी अशोक लक्ष्मण कराळे (रा. विसापुर ता. श्रीगोंदा) या रेकॉर्डवरील आरोपीला जेरबंद केले असून, दिनांक ३ रोजी ही कारवाई करण्यात आली. विसापूर येथील सरस्वती विद्यालयाच्या मागे आपल्या घराजवळ कराळे हा गावठी कट्ट्यासह फिरत असल्याची माहिती मिळाल्यावरून ही कारवाई करण्यात आली. कराळे याच्यावर दारूविक्रीसह पाच गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई सपोनि नंदकुमार सोनवलकर व तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक मोहन गाजरे,भाऊसाहेब यमगर, रवींद्र औटी, भाऊसाहेब शिंदे, शरद गांगर्ड, विनोद पवार, दादासाहेब क्षीरसागर, रवी जाधव, भापकर यांनी केली.



**हार्ट अटॅक रोखण्यासाठी अत्याधुनिक पाऊल**

## इम्पल्स हॉस्पिटलमध्ये १२८–स्लाइस सीटी स्कॅन मशीन सुरू

**अहिल्यानगरमधील सीटी कोरोनरी अँजिओग्राफीसक्षम पहिल्या १२८–स्लाइस सीटी स्कॅन मशीनचे भव्य लोकार्पण**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दवा आणि दुवा यांचा सुंदर संगम साधत, विज्ञानाधिष्ठित आणि मानवतावादी आरोग्यसेवेचा आदर्श उभा करणाऱ्या इम्पल्स हॉस्पिटलच्या कार्याचा गौरव करताना श्री क्षेत्र देवगड येथील पूज्य महंत श्री भास्करगिरी महाराज यांनी, ''दिनदुबळ्यांसाठी दर्जेदार आणि सुलभ आरोग्यसेवा देणे ही खरी समाजसेवा आहे,'' असे प्रतिपादन केले.

अहिल्यानगर शहरातील इम्पल्स हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक सीटी कोरोनरी अँजिओग्राफीस सक्षम १२८–स्लाइस सीटी स्कॅन मशीनचे लोकार्पण महाराजांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. अहिल्यानगरमधील हे पहिलेच १२८–स्लाइस सीटी मशीन असून ते सीटी कोरोनरी अँजिओग्राफी करण्यास सक्षम आहे, ही विशेष बाब आहे. यावेळी नगरसेवक कुमार वाकळे, सतीश शिंदे, बाळू महाराज, डॉ. काळे, डॉ. दरंदले, अमित शेटे तसेच डॉ. कानसे, डॉ. वारुडे, डॉ. विजय गाडे, डॉ. महेश घुगे, डॉ. ज्योती गाडे आणि ज्येष्ठ पत्रकार शिवाजी शिर्के यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविकात हृदयरोगतज्ज्ञ व संचालक डॉ. संदीप गाडे यांनी सांगितले की, या अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे इम्पल्स हॉस्पिटलच्या आरोग्यसेवेत क्रांतिकारी बदल होणार असून, रुग्णांना अत्यंत जलद, अचूक आणि सखोल निदान मिळणार आहे. १२८–स्लाइस तंत्रज्ञानामुळे कमी वेळेत उच्च गुणवत्तेची इमेजिंग मिळून उपचार प्रक्रिया अधिक प्रभावी आणि सुरक्षित होणार आहे. या यंत्राचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सीटी कोरोनरी अँजिओग्राफी ही अत्याधुनिक तपासणी. ही पूर्णपणे नॉन–इनव्हेसिव्ह, सुरक्षित आणि रुग्णांसाठी आरामदायी पद्धत असून, हृदयाच्या रक्तवाहिन्यांमधील ब्लॉकेज किंवा अरुंदपणा सुरुवातीच्या टप्प्यातच ओळखण्यास सक्षम आहे. याशिवाय, या मशीनद्वारे संपूर्ण शरीरातील विविध प्रकारच्या अँजिओग्राफी तसेच सर्व प्रकारचे सीटी स्कॅन अत्यंत अचूकतेने करता येतात, जे जुन्या तंत्रज्ञानाच्या मशीनपेक्षा अधिक प्रभावी आहे. आजच्या बदलत्या जीवनशैलीत हृदयरोग हा 'सायलेंट किलर' ठरत असून भारतात हार्ट अटॅकचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे, विशेषतः तरुण वयोगटातही त्याची तीव्रता जाणवत आहे. अशा पार्श्वभूमीवर नियमित प्रिव्हेंटिव्ह हेल्थ चेक–अप ही काळाची गरज ठरत आहे. वेळेत तपासणी केल्यास हृदयविकारांसोबतच कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचेही लवकर निदान होऊन उपचार वेळेवर सुरू करता येतात.

विशेषतः मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, धूम्रपानाची सवय, कौटुंबिक हृदयरोगाचा इतिहास असलेले, तसेच छातीत दुखणे, धाप लागणे, थकवा यांसारखी लक्षणे असलेले व्यक्तींनी सीटी कोरोनरी अँजिओग्राफीसारख्या तपासणीचा अवश्य विचार करावा, असे आवाहन डॉ. गाडे यांनी केले.

इम्पल्स हॉस्पिटलमध्ये सुमारे १०२ खाटांची सुविधा, अत्याधुनिक कार्डियाक केअर युनिट, आयसीयू, ऑपरेशन थिएटर, कॅथलॅब आणि पॅथॉलॉजी विभाग उपलब्ध असून, रुग्णांना एकाच छताखाली सर्वसमावेशक आणि उच्च दर्जाची आरोग्यसेवा देण्याचा प्रयत्न आहे. कॅथलॅब, कार्डियाक सीटी आणि हृदय शस्त्रक्रिया सुविधा यांसह इम्पल्स हॉस्पिटल आता हार्ट अटॅकसारख्या गंभीर आजारांवर तातडीने उपचार करून जीव वाचविणारे 'स्टेट–ऑफ–द–आर्ट' केंद्र म्हणून विकसित झाले आहे. ''आधुनिक तंत्रज्ञान, अचूक निदान आणि संवेदनशील सेवा'' या तत्त्वांवर आधारित इम्पल्स हॉस्पिटल भविष्यातही रुग्णसेवेत नवे मानदंड निर्माण करत राहील, असा विश्वास हृदयरोगतज्ज्ञ व संचालक डॉ. संदीप गाडे यांनी व्यक्त केला.

**काजल दरेकर-जंजिरे यांचे आंतरराष्ट्रीय मंचावर दमदार सादरीकरण**

## धर्मवीर गडाला जागतिक ओळख

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**श्रीगोंदा–** काष्टी येथील काजल दरेकर–जंजिरे हिने दिल्ली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत पेडगावच्या धर्मवीर गडावर संशोधन पत्र सादर करत महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वारशाला जागतिक व्यासपीठ मिळवून दिले. तिच्या या कामगिरीमुळे स्थानिक इतिहासाला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.



'वेळ, प्रदेश आणि भूभाग' या विषयांतर्गत सादर केलेल्या संशोधनात धर्मवीर गडाचा ऐतिहासिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक वारसा सखोलपणे मांडण्यात आला. किल्ल्याची स्थापत्य रचना, रणनीतिक महत्त्व तसेच स्थानिक परंपरा आणि लोकजीवनावर झालेला प्रभाव यावर विशेष भर देण्यात आला.

संशोधनानुसार, गडावरील शिवमंदिरे आणि पाण्याच्या मोटेच्या स्थापत्य शैलीवरून हा किल्ला यादवकालीन असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच इ.स. १६६० मध्ये औरंगजेबाने या गडाचा लष्करी तळ म्हणून वापर करत 'बहादूर गड' असे नामकरण केल्याचा इतिहासही या सादरीकरणातून उलगडण्यात आला. आजही गडाच्या भिंती, बुरुज आणि अवशेष इतिहासाच्या खुणा जिवंत ठेवत असल्याचे अधोरेखित करण्यात आले. या सादरीकरणामुळे महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या समृद्ध वारशाची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेली आहे. या संशोधनासाठी प्रा. नारायण गवळी, प्रा. नेहा मसालेकर, आय. पी. जंजिरे, सुनील दरेकर, प्रतिभा इंगळे व मच्छिंद्र पंडित यांचे मार्गदर्शन लाभले.

## विवाहितेच्या छळ प्रकरणी पतीसह सहाजणांवर गुन्हा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हॉटेल व्यवसायासाठी माहेरहून अकरा लाख रुपये घेऊन ये, अशी मागणी करून विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्या प्रकरणी पतीसह सहाजणांवर भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पती मुदस्सर अस्लम मालजप्ते, सासू हमीदा अस्लम मालजप्ते, दीर मोहसीन अस्लम मालजप्ते, जाव तमन्ना मोहसिन मालजप्ते (सर्व रा–वडळी रोड, आयआयटी कॉलेजसमोर, श्रीगोंदा) तसेच नणंद आसमा मुदस्सर शेख व नंदावा मुदस्सर शेख (दोघे रा. कुंभार गल्ली, दौंड जि. पुणे) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे असून, याबाबत विवाहिता जस्मिन मुदस्सर मालजप्ते (वय–३३ वर्षे, मूळ रा. वडळी रोड, आयआयटी कॉलेजसमोर, श्रीगोंदा. हल्ली रा. कादरी मशिदीजवळ, मुकुंदनगर) यांनी फिर्याद दिली आहे.

सन २०१७ मध्ये मुस्लिम रिवाजानुसार लग्न झाल्यानंतर सासरकडील लोकांनी २०२४ पर्यंत व्यवस्थित नांदवले. लग्न झाले त्यावेळी पती मुद्दसर हा श्रीगोंदा पंचायत समितीत कामाला होता. नंतर हॉटेल टाकण्यासाठी माहेरहून अकरा लाख रुपये आण तसेच फर्निचर व इतर गोष्टींची मागणी करून सासरच्यांनी विवाहितेचा छळ सुरू केला. नेहमी शिवीगाळ, दमदाटी करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व उपाशीपोटी ठेवून शारीरिक व मानसिक छळ केला. तसेच जीवे मारून टाकू अशी धमकी देऊन घराबाहेर हाकलून दिले, असे फिर्यादीत नमूद असून, त्यावरून पती, सासू–सास–यासह सहाजणांवर भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## दै. आकर्षण निवडक

### नवनागापूर येथे गुरुवारपासून अखंड नामजप, यज्ञ, प्रहर सप्ताह



अहिल्यानगर - नवनागापुरातील गजानन कॉलनी येथील श्री स्वामी समर्थ सेवा, अध्यात्मिक विकास व बाल सु-संस्कार केंद्रात श्रीस्वामी समर्थ महाराज पुण्यतिथीनिमित्त ९ ते १५ एप्रिलदरम्यान अखंड नाम, जप, यज्ञ, प्रहर सप्ताह व सामुदायिक गुरुचरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.गुरुवारपासून सुरू होणाऱ्या या यज्ञज्ञाग सेवेअंतर्गत सकाळी १०.३० ते दुपारी १२ या कालावधीत दररोज नित्य स्वाहाकाराबरोबरच विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहापूर्वी बुधवारी ग्रामदेवता निमंत्रण व मंडल मांडणी होईल. दि. ९ - मंडल स्थापना, अग्निस्थापना, स्थापित देवता हवन होईल. दि. १० - गणेशयाग, मनोबोध याग. दि. ११ - चंडी याग. दि. १२ - स्वामी याग, दि. १३ - श्री गिताई याग, दि. १४ - रूद्रयाग, मल्हारी याग. दि. १५ रोजी बली पूर्णाहुती, श्री सत्यदत्त पूजन, देवता विसर्जन होईल. याच दिवशी महानैवेद्य आरती मार्गदर्शन व महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल. श्री स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त होणार्या या सर्व कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन नवनागापूर येथील केंद्रातर्फे करण्यात आले आहे.

### श्री मैढ़ क्षत्रिय सोनार समाज महाराष्ट्र प्रदेशची बैठक संपन्न

अहिल्यानगर- श्री मैढ़ क्षत्रिय सोनार समाज महाराष्ट्र प्रदेश पदाधिकारी बैठक नगरमध्ये संपन्न झाली,यावेळी श्री मैढ़ क्षत्रिय सोनार समाज महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्री हरिषजी खजवाणिया,सचिव भरत खजवानीया,उपाध्यक्ष अनिल कडेल,सहसचिव संदीप खजवानीया, खजिनदार राजकुमार अग्रोया ,सहखजिनदार कमलकिशोर बदलीया यांच्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून प्रतिनिधी उपस्थित होते आलेल्या प्रतिनिधींचे श्री मैढ़ क्षत्रिय सोनार समाज अहिल्यानगर चे अध्यक्ष अध्यक्ष श्री श्रीकीसनजी मिरांडे,युवा मंच अध्यक्ष व भाजपा शहर जिला उपाध्यक्ष श्री गोपाल वर्मा,श्री मदनलालजी मिरांडे, श्री कांतिलालजी जवडा, श्री ओमप्रकाश सहदेव,श्री भरत वर्मा, श्री अशोक धुप्पड, श्री कन्हैयालाल वर्मा, श्री गोपीकीसन वर्मा, इ त्यांचे स्वागत करून सत्कार केले. समाजाच्या निवडणुका ७ वर्षानंतर पुणे येथे झाल्या,नवीन कार्यकारणी निवडण्यात आली. त्यानंतर नगर मधील ही पहिलीच बैठक होती व समाजातील जनजागृतीसाठी राज्यात दौरा सुरु करण्यात आला,त्यानंतर राज्यातील प्रत्येक ठिकाणी समाजाचे पदाधिकाऱ्यांचे निवड किंवा निवडणुका घेण्यात येणार आहेत,यावेळी राज्य पदाधिकाऱ्यांचे अहिल्यानगर समाजाच्या वतीने सर्वांचे स्वागत करून सन्मान करण्यात आला.

### बेकायदेशीर जातपंचायतीतून गायकवाड कुटुंबावर बेदम मारहाण

अहिल्यानगर- जातपंचायतींना कायद्याने बंदी असतानाही आष्टी तालुक्यातील कानडी बुद्रुक येथे बेकायदेशीर जातपंचायत भरवून तिरमली समाजातील गायकवाड कुटुंबावर बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी अद्याप फरार असल्याची माहिती समोर आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, दोन गटांतील जमिनीच्या वादावर तोडगा काढण्यासाठी गावातील काही व्यक्तींनी जातपंचायत भरवली होती. या पंचायतीत प्रमुख म्हणून बाबुराव साहेबराव फुलमाळी, गंगाराम शंकर फुलमाळी, सरपंच गुलाब गोपाळा गायकवाड, महेश बोरा गायकवाड, माणिक साहेबा फुलमाळी, भीमा साहेबराव फुलमाळी आणि बाजीराव सठवा फुलमाळी यांचा सहभाग होता. पंचायतीदरम्यान दोन्ही गट आपापली बाजू मांडत असताना पंचांनी मध्यस्थी करण्याऐवजी वाद अधिक चिघळवण्याचा प्रयत्न केला. तसेच, दुसऱ्या गटाकडून पैसे घेऊन एका गटाला दुसऱ्या गटावर हल्ला करण्यास प्रवृत्त केल्याचेही सांगितले जात आहे.

# अहिल्यानगर तालुका माहेश्वरी सभेची सर्वसाधारण सभा उत्साहात

**नवीन कार्यकारिणीची बिनविरोध निवड अध्यक्षपदी गोपाल मणियार तर सचिवपदी सुरेश चांडक**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर तालुका माहेश्वरी सभेची सर्वसाधारण सभा महेश मंगल कार्यालय, रामचंद्र खुंट येथे उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेला समाजातील मान्यवर सदस्यांची लक्षणीय उपस्थिती लाभली होती. सभेच्या अध्यक्षस्थानी मान्यवर उपस्थित होते तर तालुका निवडणूक अधिकारी म्हणून संगमनेर येथील सतीश बाहेती यांनी कामकाज पाहिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन कार्यकारिणीची निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये तालुका अध्यक्षपदी गोपाल मणियार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच सचिवपदी सुरेश चांडक यांचीही बिनविरोध निवड करण्यात आली.

इतर पदाधिकाऱ्यांची निवड पुढीलप्रमाणे करण्यात आली : खजिनदार संजय कालानी, उपाध्यक्ष ओम सोमाणी, सहसचिव संजय भक्कड, संघटन मंत्री मनोज जाजू.

निवडीनंतर बोलताना नूतन अध्यक्ष गोपाल मणियार यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''माझ्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी ही केवळ पद नसून समाजाच्या विश्वासाचे प्रतीक आहे. सर्वांना सोबत घेऊन समाजातील एकोप्याला बळकटी देणे, युवकांना संघटनेशी जोडणे आणि सामाजिक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट राहील. शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक एकजूट या क्षेत्रांत काम करण्यास प्राधान्य दिले जाईल.

माहेश्वरी समाजाची परंपरा आणि संस्कृती जपत नवीन पिढीला योग्य दिशा देणे आवश्यक आहे. सर्व सदस्यांच्या सहकार्याने आगामी कार्यकाळात अनेक विधायक उपक्रम राबविण्याचा निर्धार आम्ही करीत आहोत.

सचिव म्हणून निवड झाल्यानंतर सुरेश चांडक यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''संघटनेचे दैनंदिन कामकाज पारदर्शक व सुबक पद्धतीने चालविणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट राहील. सर्व सदस्यांमध्ये समन्वय साधत संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू.'' ते पुढे म्हणाले, ''समाजातील विविध घटकांना एकत्र आणून सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना चालना देणे आवश्यक आहे. नवीन कार्यकारिणीच्या सहकार्याने संघटनेचे कार्य अधिक गतिमान करण्याचा आमचा प्रयत्न असेल. सभेदरम्यान उपस्थित मान्यवरांनीही आपले विचार मांडले. समाजातील ऐक्य, संघटनात्मक बळ आणि युवकांचा सहभाग वाढविण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. तसेच नव्या कार्यकारिणीने समाजहिताच्या दृष्टीने कार्य करावे, अशा अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या.

## प्रज्ञा चौदाव्या राज्यस्तरीय साहित्य संमेलन नागपूरमध्ये

# नगर येथील लेखक कवी बाळासाहेब देशमुख सन्मानित

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रज्ञा बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र आयोजित १४ वे मराठी साहित्य संमेलन नागपूर येथे संपन्न झाले. संमेलन अध्यक्ष पदी ज्येष्ठ कवी श्यामसुंदर गावकर मुंबई हे होते. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थापिका देगलूरकर, प्रमुख अतिथी सौ अंजली डोळे पुणे, उद्घाटक राज यावलीकर अमरावती हे होते.

साहित्य संमेलन प्रसंगी बोलताना संस्थापिका लीना देगलूरकर म्हणाल्या समाजामध्ये अनेक लोक वेगवेगळ्या प्रांतांमध्ये,वेगवेगळे कार्य अविरतपणे निष्काम पणे करत असतात. त्यांचे हे कार्य, समाजभान दिशादर्शक असते. अशा अशा साहित्यिकांची, मान्यवरांची मांदीयाळी ,आज संमेलन निमित्ताने पाहताना अभिमान दाटून येतो. इंटरनेट, मोबाईलचा अतिवापर टाळत, वाचन संस्कृतीला घराघरातून सर्वांनी प्राधान्य द्यायला हवे. सर्व साहित्यिकांच्या साहित्यकृती पाहताना,वाचताना, त्यांना सन्मानित करताना , ऊर अभिमानाने भरून येतो. सदर साहित्य संमेलन मध्ये अहिल्यानगर येथील कवी लेखक श्री बाळासाहेब देशमुख यांनी शिकवण ही रचना सादर केली. ग्रामीण




भागातील आई–वडील आपल्या मुलांना संगोपन करताना संस्कार, संस्कृतीचे बाळकडू कसे दिले जाते. यावर त्यांनी भाष्य केले. सदर साहित्य संमेलनमध्ये ज्येष्ठ कवयित्री प्रमुख अतिथी सौ अंजली डोळे पुणे, कवी संमेलनाध्यक्ष दीपक करगुंटकर मुंबई. या मान्यवरांच्या हस्ते बाळासाहेब देशमुख यांना सन्मानित करण्यात आले.

बाळासाहेब देशमुख यांचे रंग माझा वेगळा, माणसे अशी.. अन् तशीही.., माणसे.. भिंगातून इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ साहित्यिक अजित उबाळे यांनी केले. तर ज्येष्ठ साहित्यिक राजाभाऊ धर्माधिकारी यांनी आभार प्रदर्शन व्यक्त केले.

# पानंद रस्ते कामांना गती द्या; आमदार भुमरे यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

**तहसील कार्यालयात आढावा; प्रलंबित कामांवर कारणमीमांसा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ते योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांचा तहसील कार्यालयात आज सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी आमदार विलास बापू भुमरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा करत प्रलंबित कामांची कारणमीमांसा केली.

बैठकीत प्रत्येक काम निश्चित वेळेत पूर्ण होईल यासाठी अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या. काही कामे रखडल्याचे निदर्शनास येताच कामांना गती देण्याचे निर्देशही देण्यात आले. शेतकऱ्यांच्या दळणवळणाच्या सोयी सुधारण्यासाठी ही



योजना अत्यंत महत्त्वाची असून ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी दर्जेदार व वेळेत कामे पूर्ण होणे आवश्यक असल्याचे आमदार भुमरे यांनी नमूद केले. प्रशासनाने जबाबदारीने काम करत गती वाढवावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी उपविभागीय अधिकारी (एस.डी.एम.) नीलम बाफना, तहसीलदार ज्योती पवार तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# पैठण वकील संघासाठी भव्य ग्रंथालय उभारणार; खासदार–आमदारांची घोषणा

**वकील बांधवांच्या अडचणी जाणून घेत दिला दिलासा; सत्कार सोहळा उत्साहात**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदिपान भुमरे पाटील आणि पैठणचे आमदार विलास भुमरे पाटील यांनी पैठण येथील तालुका व जिल्हा वकील संघाला भेट देत वकील बांधवांच्या विविध अडचणी जाणून घेतल्या. यावेळी त्यांच्या सहकार्याने वकील संघासाठी भव्य ग्रंथालय (लायब्ररी) तसेच आवश्यक फर्निचर उभारण्याची घोषणा करण्यात आली.

वकील बांधव व भगिनींसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी ग्रंथालयाची उभारणी महत्त्वाची ठरणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. या निर्णयामुळे वकील संघात समाधानाचे वातावरण



निर्माण झाले आहे.

या प्रसंगी वकील संघाच्या वतीने खासदार व आमदार यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला जिल्हा व तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. संदीप जाधव, उपाध्यक्ष ॲड. वैभव चव्हाण, सचिव ॲड. सुभाष खडसन, सहसचिव ॲड. इमरान शेख, कोषाध्यक्ष ॲड. स्वप्निल उगले तसेच सदस्य ॲड. संदीप नाडे, ॲड. रमेश गव्हाणे, अँड. आस्मा खानापुरे यांच्यासह अनेक वकील उपस्थित होते.कार्यक्रमाला पैठण वकील संघातील वकील बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगरसेवकांच्या प्रामाणिक प्रयत्नांमुळे नागरिकांना अपेक्षित विकासकामे मार्गी - सतीश डुंगरवाल

**एमएसईबी कॉलनीतील रहिवाशांच्या वतीने नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बुरूडगाव रोड , माणिकनगर परिसर मागील काही काळात मोठ्या प्रमाणात विकसित झाला आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभागातील नगरसेवकांनी विविध समस्यांचा अभ्यास करून नागरिकांना अपेक्षित विकासकामे मार्गी लावली आहेत. त्यामुळे या परिसरात प्रशस्त रस्ते, पाणी, पथदिवे, उद्याने अशी अनेक कामे झाली आहेत. शहरातील आदर्श प्रभाग म्हणून हा भाग ओळखला जातो. त्यामुळे येथील रहिवासी समाधानी आहेत. नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सर्वच नगरसेवक तत्पर असतात. येत्या काळात नवनिर्वाचित नगरसेवक प्रभागात आणखी भरीव विकासकामे करून उर्वरित नागरी समस्यांची सोडवणूक करतील असा विश्वास सतीश डुंगरवाल यांनी व्यक्त केला.

प्रभाग क्रमांक १४ मधील नवनिर्वाचित नग आनंद रसेवक गणेश भोसले, प्रकाश भागानगरे, मीनाताई चोपडा, सुनीता फुलसौंदर, भगवानराव फुलसौंदर संजय चोपडा एमएसईबी कॉलनीतल्या सूनबाई नगरसेविका अनिता शेटिया यांचा एमएसईबी माणिकनगर परिसतील रहिवाशांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सतीश डुंगरवाल बोलत होते. याप्रसंगी अशोक लोढा, हरजीत सिंग वधवा डॉक्टर चेतन चौधरी, गिरीश फिरोदिया, नरेश फिरोदिया, प्रशांत आघवडे, दीपक तलरेजा, विपुल शेटिया, गणेश गांधी, भापकर, मनोज पितळे, राहुल डुंगरवाल, सतीश बोथरा, बांठिया, कमलेश बोथरा आदींसह रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नगरसेवक गणेश भोसले म्हणाले की, आमदार संग्राम जगताप यांच्या दूरदृष्टीचा नेतृत्वाखाली प्रभाग १४ चा कायापालट करण्यात यश आले आहे. मूलभूत सोयी सुविधांची अनेक कामे दर्जेदार करण्यावर भर दिला आहे. या परिसरात व्यापारी वर्ग मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहे. त्यांच्याशी वेळोवेळी संवाद साधून व त्यांच्या सहकार्याने प्रभागात पथदर्शी विकासकामे झाली आहेत. संपूर्ण नगर शहरात हा प्रभाग आदर्श म्हणून ओळखला जातो. प्रभागातील नागरिकांनी मोठ्या विश्वासाने आम्हाला पुन्हा एकदा संधी दिली आहे. सर्वांना सोबत घेऊन हा विश्वास सार्थ ठरवण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करू.

## भगवानगडाच्या नारळी सप्ताहासाठी माजीमंत्री धनंजयजी मुंडे,

# प्रा.लक्ष्मण हाके सर यांच्यासह दिग्गजांची बडेवाडीमध्ये राहणार उपस्थिती


**महंत न्यायाचार्य श्री.नामदेव महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार नारळी सप्ताहाची सांगता**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**भगवानगड–** श्री संत भगवानबाबांनी प्रारंभ केलेल्या नारळी सप्ताहाच्या ९२ व्या वर्षीचे यजमानपदाचे शिवधनुष्य हे भगवानगडाच्या दक्षिण बाजूला असलेल्या बडेवाडी ग्रामस्थांनी उचलले आहे. श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह सुरू असून सप्ताहाचा आज काला आहे. श्री संत भगवानबाबांनी फिरता नारळी सप्ताहाचा नाविन्यपुर्ण उपक्रम ९२ वर्षांपूर्वी श्री क्षेत्र नारायणगडाच्या पायथ्याशी असलेल्या पखालडोह या ठिकाणी सुरू केला.

त्यांचे पश्चात तीच सप्ताहाची परंपरा श्री क्षेत्र भगवानगडाचे द्वितीय उत्तराधिकारी अष्टपैलू संत, वै.ह.भ.प.गुरुवर्य श्री संत भिमसिह महाराज यांनी सुरू ठेवत बाबांचे कार्य सुरू ठेवले होते. वै.गुरुवर्य भीमसिंह महाराजांच्या वैकुंठगमनानंतर श्री क्षेत्र भगवानगडाचे तृतीय उत्तराधिकारी तथा विद्यमान मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या सप्ताहाची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. हा नारळी सप्ताह वैभवशाली असल्याने संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो भाविकांची सप्ताहामध्ये आठवडाभर उपस्थिती आहे. नारळाचे यजमानपद स्विकारलेले बडेवाडी ग्रामस्थ आठवडाभर तन, मन आणि धन खर्ची घालत श्रीगुरूंची सेवा करत आहेत.

३१ मार्च रोजी हा महोत्सव प्रारंभ झाला असून सप्ताहामध्ये ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली




भागवताचार्य ह.भ.प. श्री.प्रकाश महाराज साठे यांच्या अमृततुल्य रसाळवाणीतून ७ दिवस भव्य श्रीमद् भागवत कथा निरूपण सोहळ्याचा उपस्थित लाखो भाविकांना लाभ झाला आहे. सप्ताहामध्ये ह.भ.प.महंत श्री.रामगिरी महाराज (येळेश्वर संस्थान येळी), ह.भ.प.श्री.महेंद्र महाराज महाराज शास्त्री, ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर, ह.भ.प.श्री.प्रभाकर महाराज बोधले पंढरपूरकर, श्री क्षेत्र भगवानगडाचे उत्तराधिकारी ह.भ.प.महंत श्री.कृष्णा महाराज शास्त्री यांच्या कीर्तन सेवा संपन्न झाल्या असून सप्ताहाच्या सातव्या दिवशी रात्री ठीक ८:३० ते ११ या वेळेत श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांचे जागराचे सुश्राव्य, अमृततुल्य कीर्तन संपन्न झाले आहे. आज काल्याच्या दिवशी श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल. सप्ताहामध्ये दररोज पहाटे काकडा भजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, हरिपाठ इ. धार्मिक कार्यक्रम संपन्न झालेले आहेत.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### शहरातील कचरा वेचक बांधवांच्या उपजीविकेचा प्रश्न गंभीर

अहिल्यानगर - शहरातील कचरा वेचक बांधवांच्या उपजीविकेचा प्रश्न गंभीर बनला असून, कचरा गाडीवरील सुका कचरा स्थानिक कचरा वेचकांना देण्याची मागणी कागद काच पत्रा कष्टकरी पंचायत, अहिल्यानगर यांच्या वतीने महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या मागणीची दखल न घेतल्यास येत्या १५ दिवसांत महानगरपालिकेवर आक्रोश मोर्चा काढण्याचा इशारा समितीचे जिल्हा समन्वयक विकास उडाणशिवे यांनी दिला आहे. अहिल्यानगर महानगरपालिकेमार्फत शहरातील कचरा व्यवस्थापनासाठी कचरा घंटा गाडी वर परप्रांतीय कामगारांची नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित ठेकेदारामार्फत या कामगारांना नियमित वेतन दिले जात असतानाच, त्याचबरोबर कचरा गाडीवरील सुका कचराजसे की प्लास्टिक, कागद, लोखंडगोळा करून त्याची विक्री केली जात आहे. यामुळे या कामातून दुहेरी उत्पन्न मिळत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.या परिस्थितीचा सर्वाधिक फटका स्थानिक कचरा वेचकांना बसत आहे. सुका कचरा मिळत नसल्याने त्यांचे प्रमुख उत्पन्नाचे साधन बंद झाले असून, अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. कचरा वेचक हे समाजातील अत्यंत दुर्बल घटक असल्याने त्यांच्या हक्कांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये स्थानिक कचरा वेचकांना सोबत घेऊन कचरा व्यवस्थापन यशस्वीपणे राबवले जात आहे. स्वच्छ पुणे, अवनी कोल्हापूर आणि स्त्री मुक्ती संघटना यांसारख्या संस्थांनी स्थानिक प्रशासनासोबत समन्वय साधून प्रभावी कामगिरी केली आहे. या उपक्रमांमुळे संबंधित शहरांमध्ये स्वच्छतेचा स्तर उंचावला असून, कचरा वेचकांना स्थिर रोजगारही उपलब्ध झाला आहे.

### काळी आईच्या मुक्तीसाठी पीपल्स हेल्पलाईनचा लढा

अहिल्यानगर "जमीन विकली नाही ती लुटली गेली!" असा तीव्र आक्रोश करत महाराष्ट्रातील विविध गावांतील शेतकरी आता उघडपणे पुढे येत आहेत. या शेतकऱ्यांच्या जमिनी वाचविण्यासाठी पीपल्स हेल्पलाईनने "डिच्चू फत्ते!" या घोषवाक्यासह काळी आईच्या मुक्तीसाठी अभियान सुरू केले आहे. जनलोक अदालत व जनलोक न्यायभारतच्या माध्यमातून पीडित शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला जाणार आहे.धनदांडगे व सावकारांकडून फसवणूक, दबाव आणि दिशाभूल करून शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावल्या जात असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर समोर येत आहेत. या चळवळीचा पुढील टप्पा म्हणून १२ एप्रिल २०२६ रोजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर, हुतात्मा स्मारक येथे विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेसाठी पीडित शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### शिवाजीराव चव्हाण यांचे वृद्धापकाळाने निधन

अहिल्यानगर - येथील ज्येष्ठ नागरिक



शिवाजीराव मुरलीधर चव्हाण यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते. त्यांच्या मागे पत्नी, तीन मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार होता. मूळचे बर्हाणपूर (ता. नेवासा) येथील असलेले शिवाजीराव ठाणे येथे सँडोज इंडिया लिमिटेड या बहुराष्ट्रीय कंपनीत जनरल मॅनेजर पदावरून निवृत्त झाले होते. ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर ते नगरला स्थायिक झाले. ते मनमिळावू व शिस्तप्रिय होते. सी.जी. पॉवर कंपनीचे अधिकारी मिलिंद वाळके यांचे ते सासरे, तर छत्रपती इंजिनीअरिंग कॉलेजच्या विभागप्रमुख डॉ. शिल्पा वाळके यांचे वडील होत. चव्हाण यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

# जिल्हा बँकेच्या ११३११ कोटींच्या ठेवी

## चंद्रशेखर घुले पाटील यांची माहिती; ठेवींचा विक्रम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी





**अहिल्यानगर–** जिल्हा ध्यवर्ती सहकारी बँकेचे आर्थिक वर्षांच्या अखेरीस ठेवींमध्ये विक्रमी वाढ नोंदवत ११ हजार ३११ कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. बँकेच्या इतिहासात प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणात ठेवी जमा झाल्याने ठेवीदारांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल बँकेचे चेअरमन चंद्रशेखर घुले पाटील यांनी आभार व्यक्त केले.

मार्च २०२६ अखेर बँकेची कर्जवसुली ३४.४७ टक्क्यांवर पोहोचली असून अडचणींच्या काळातही शेतकरी सभासदांनी कर्जाची परतफेड केल्याचे त्यांनी नमूद केले. जिल्ह्यातील ग्राहकांनी आपली गुंतवणूक जिल्हा बँकेत ठेवून बँकेवरील विश्वास दृढ केला असल्याचेही त्यांनी सांगितले.

बँक ठेवीदारांना आकर्षक व्याजदरासह विविध सेवा देत असून डिजिटल सेवांमध्येही राज्यात आघाडीवर आहे. सोनेतारण कर्जासाठी राबविण्यात आलेल्या विशेष उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत असून, ८ टक्के व्याजदराने प्रति व्यक्ती ५ लाख रुपर्यांपर्यनत कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे. मार्च २०२६ अखेर या योजनेअंतर्गत १४६ कोटी रूपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. सध्या ११८ शाखांमध्ये ही सुविध उपलब्ध असून लवकरच ही १६० शाखांपर्यंत विस्तारली जाणार आहे.

रिझर्व्ह बँकेच्या निकषांनुसार बँकेचा सीडी रेशो ६८.२२ क्के असून हा बँकींग क्षेत्रात आदर्श अमानला जातो. असे घुले पाटील स्पष्ट केले.

व्हाईस चेअरमन ॲड. माधवराव कानवडे यांनी सांगतले की सहकार वर्षात वसुलीस पात्र असलेल्या ५ हजार ८३४ कोटींपैकी मार्च अखेर २ हजार ११ कोटी रुपयांची वसुली झाली असून त्यात १ हजार ८६३ कोटी रुपयांचे पीक कर्ज समाविष्ट आहे. सेवा सोसायट्यांच्या माध्यमातून शेतकरी सभासदांनी मोठ्या प्रमाणात वसुली केल्याने सहकारी संस्थांवरील आर्थिक ताण काही प्रमाणात कमी झाला आहे.

## बाबासाहेब गवते यांचा महाराष्ट्र भूषण आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरव

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** समता प्रतिष्ठानच्या (महाराष्ट्र राज्य) वतीने शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल बाबासाहेब जालिंदर गवते यांना "महाराष्ट्र भूषण आदर्श शिक्षक पुरस्कार" देऊन सन्मानित करण्यात आले.

नुकतेच झालेल्या शिक्षकांच्या सन्मान सोहळ्यात पदवीधर आमदार सत्यजित तांबे यांच्या हस्ते गवते यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

आमदार सत्यजित तांबे यांनी गवते यांच्या कार्याचे कौतुक करुन "समाज घडविण्याच्या प्रक्रियेत शिक्षकाची भूमिका कणा मानली जाते. गवते यांनी आपल्या ज्ञानदानाबरोबरच कर्तृत्वातून विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. अशा निष्ठावान शिक्षकांचा सन्मान करणे हे समाजाचे कर्तव्य आहे. त्यांचे कार्य इतर शिक्षकांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि विविध सामाजिक क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना गवते यांनी हा पुरस्कार आपल्या विद्यार्थ्यांच्या आणि सहकाऱ्यांच्या प्रेमाचे प्रतीक असल्याचे सांगितले. बाबासाहेब गवते यांना मिळालेल्या या राज्यस्तरीय पुरस्कारामुळे त्यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# गुरु हे भक्तांना परमेश्वराशी एकरुप करतात – हभप राधाकृष्णजी महाराज

## गुरुदत्त भक्तीचा मंदिरात हभप राधाकृष्णजी महाराज यांची सदिच्छा भेट



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** ३ एप्रिल ते ९ एप्रिल या कालावधीत श्रीमद भागवत कथेचे दुपारी २ ते ६ यावेळी नंदनवन लॉन्स, न्यू टिळक रोड येथे रामनिवास सतीशचंद्र इंदाणी यांनी भक्तांसाठी कथेचे आयोजन केले आहे.जोधपूर येथील प.पू.गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांच्या रसाळ वाणीतून श्रीमद भागवत कथेचे निरूपण केले जात आहे.

संत किसनगिरी नगर येथील गुरुदत्त भक्तीधाम येथे प.पू.गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांनी सदिच्छा भेट दिली असता देवगड देवस्थानचे महंत गुरुवर्य हभप भास्करगिरीजी महाराज यांनी त्यांचे स्वागत केले.याप्रसंगी संतांचा अनोखा मिलाप व प्रवचनाचा लाभ भक्तांनी घेतला.

यावेळी राधाकृष्णजी महाराज म्हणाले,गुरुदत्त भक्तीधाम मंदिराचा कळस जसा चमकदार आहे तसा मंदिराचा पाया ह भक्कम आहे.येथे सद्गुरू किसनगिरी बाबांची कृपा आहे असे दिसते.या मंदिरात आल्यानंतर देवगडच्या दत्त मंदिरात आल्यासारखेच वाटत आहे. मन प्रसन्न होते.देवगडच्या मंदिराची शिस्त,स्वच्छता व अनुशासन याचे दर्शन या गुरुदत्त भक्ती दाम मंदिरात झाले आहे.गुरु आपल्या जीवनात येतात,प्रत्येक जीवाला भगवंताची जोडण्यासाठी येत असतात. गुरु हे स्वतःला जोडण्यासाठी नाही तर परमेश्वराला भक्तांशी जोडण्यासाठी असतात.ज्या भक्तांवर सद्गुरुकृपा आहे. त्यांनाच भास्करगिरीजी बाबा यांच्यासारखे गुरु मिळतात.

श्री क्षेत्र देवगड येथे अधिकमास निमित्त दि.२१ मे ते २७ मे या कालावधीमध्ये "विठ्ठल रस भक्ती महोत्सव" चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये श्रीमद् भागवत कथा, कीर्तन तसेच नामदेव भक्ती,तुकाराम भक्ती, तसेच संतांच्या सानिध्यात कथा कीर्तन रस कुंभ होत आहे.याचा सर्व भक्तांनी लाभ घ्यावा.असे आवाहन हभप राधाकृष्णजी महाराजांनी केले आहे.

हभप भास्करगिरी जी महाराज म्हणाले,गुरुदत्त भक्तीधाम मंदिरात प.पू.गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांनी सदिच्छा भेट दिली हा दिवस सुवर्ण अक्षरांमध्ये लिहून ठेवण्यासारखा आहे.गुरु हे सर्वश्रेष्ठ आहे.गुरूप्रती नतमस्तक रहावे.देवाने संत भिन्न नाहीत.देवावर गुरूवर श्रद्धा ठेवा, धर्मावर निष्ठा बळकट करा,देव देश आणि धर्मासाठी कार्य करा. सद्गुरु हे भक्तिमार्ग सांगत असतात.निस्वार्थ भक्तीने परमेश्वराची प्राप्ती होते.भगवान श्री दत्तात्रय यांच्या कृपेने जीवन सफल होते.

गुरुदत्त भक्तीधाम मंदिरात संत मिलनाने भाविक मंत्रमुग्ध झाले.याप्रसंगी पाईपलाईन रोड,किसनगिरी नगर परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी सद्गुरु किसनगिरी बाबा नगर भक्त मंडळ व बन्सी महाराज मिठाईवाले यांनी परिश्रम घेतले.

# केडगाव स्थानकात भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव उत्साहात



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** केडगाव येथील अंबिकानगर स्थानकाच्या प्रांगणात श्रावक संघ अध्यक्ष पन्नालालजी बोकरीया यांच्या अध्यक्षतेखाली परमपिता भगवान महावीर स्वामी यांच्या जन्मकल्याणक महोत्सवाचा कार्यक्रम यंदाही अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आणि भक्तिमय जल्लोषात पार पडला. उपप्रवर्तिनी साध्वीरत्न पू.श्री. कंचनकवरजी म.सा., पू.श्री.सुयशाजी म. सा, पू श्री. दिव्ययशाजी म सा, पू.श्री मलयाजी म. सा. आदि ठाणा यांच्या सानिध्यात हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. परिसरातील जैन बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महोत्सवाची शोभा वाढवली.

महोत्सवाची सुरुवात झेंडा चौक, भूषणनगर येथून सकाळी शोभायात्रेने झाली. भगवान महावीर स्वामींच्या जयघोषांनी परिसर दुमदुमून गेला होता. विविध सजवलेल्या रथांमधून आणि आकर्षक वेशभूषेत सहभागी झालेल्या भाविकांमुळे शोभायात्रेला विशेष रंगत प्राप्त झाली. महिलांनी लाल साडी तर पुरुषांनी पांढऱ्या वेशभूषेत सहभागी होत पारंपरिक एकात्मतेचे दर्शन घडवले.

शोभायात्रेनंतर स्थानकात प्रवेश होताच पुढील धार्मिक कार्यक्रमांना सुरुवात झाली. या प्रसंगी पाठशाळेतील लहान मुलांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. स्तवन, भजन आणि नवकार महिला मंडळ यांच्या नाटिकेच्या माध्यमातून भगवान महावीरांच्या जीवनातील मूल्ये आणि शिकवण प्रभावीपणे मांडण्यात आली.

यानंतर महासतीजी प.पू. कंचनकवरजी म.सा. यांनी आपल्या प्रवचनातून भगवान महावीरांच्या अहिंसा, सत्य आणि संयम या तत्त्वज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी समाजात शांतता, सहिष्णुता आणि सद्भावना टिकवण्यासाठी महावीरांच्या विचारांचे आचरण करण्याचे आवाहन केले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी उपस्थित भाविक भारावून गेले. कार्यक्रमाच्या शेवटी मंगलपाठ पार पडला. भक्तांनी मोठ्या श्रद्धेने सहभागी होत धार्मिक वातावरणात एकात्मता अनुभवली. त्यानंतर गौतम प्रसादीचे वाटप करण्यात आले, ज्यामध्ये सर्वांनी सहभाग घेतला. प्रसादीचा लाभ घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी दिसून आली.

या महोत्सवाचे आयोजन श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ, गुरुदेव युवा मंच, तसेच विविध महिला मंडळांनी संयुक्तपणे केले होते. गेल्या दहा वर्षांपासून या ठिकाणी हा महोत्सव सातत्याने साजरा केला जात असून, दरवर्षी त्यामध्ये अधिकाधिक भक्त सहभागी होत आहेत.

संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन आणि व्यवस्थापन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. आयोजकांनी सर्व घटकांचा समन्वय साधत हा महोत्सव यशस्वीरीत्या पूर्ण केला. या उत्सवामुळे केडगाव परिसरात धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक एकात्मतेचा सुंदर संदेश पुन्हा एकदा अधोरेखित झाला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. मयुरजी चोरडीया यांनी केले. आभार सम्राटजी बरमेचा यांनी व्यक्त केले.

# अनुवाद अधिकारी म्हणून डॉ. बोरुडे यांची निवड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** मराठीतील ख्यातनाम साहित्यिक डॉ. संजय बोरुडे यांची केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयात वरिष्ठ अनुवाद अधिकारी म्हणून निवड झाली आहे. डॉ. संजय बोरुडे हे प्राथमिक शिक्षक असून त्यांनी मुंबई विद्यापीठातून १९९० नंतरची मराठी ग्रामीण कविता या विषयावर पीएच.डी . प्राप्त केली आहे.

डॉ. बोरुडे यांनी विमलेश त्रिपाठी ( प . बंगाल ) यांचा कवितासंग्रह हिंदीतून मराठीत , सॅन्दोर हालमोसी(हंगेरी ) यांचा कविता संग्रह इंग्रजीतून मराठीत , प्रशांत कुमार महांति (ओरिसा) यांचा कथासंग्रह हिंदीतून इंग्रजीत, शशिकांत हिंगोणेकर यांचा कवितासंग्रह मराठीतून हिंदीत, रावसाहेब जाधव यांचा बालकविता संग्रह मराठीतून हिंदीत अनुवादित केला आहे. त्यांच्या स्वतःच्या या इंग्रजी कवितासंग्रहाचा अनुवाद हंगेरियन भाषेत मुरायनी झिटा यांनी (बुडापेस्ट)केला आहे. तर हम्पीचे महेश बल्लारी यांनी कन्नड भाषेत; भुवनेश्वरच्या पारमिता षडंगी यांनी उडिया भाषेत; राजस्थानी भाषेत बिकानेर येथील साहित्यिक नीरज दइया यांनी , नेपाळी भाषेत सिक्कीमचे विरभद्र कार्कीढोली , मल्याळम भाषेत नीलांबूरचे डॉ. टी. सिवन कुट्टी यांनी अनुवाद केलेला आहेत. तर बंजारा बोलीत शेवगावचे डॉ.संतोष राठोड करत आहेत .

याखेरीज त्यांनी अनेक भारतीय लेखक – कवयित्रींच्या कथा, कविता मराठीत अनुवाद केल्या आहेत .त्यामध्ये दिल्लीच्या ज्योती चावला, उमाशंकर चौधरी, जसवीर त्यागी, बंगालचे प्राणेंद्रनाथ मिश्रा इ. मान्यवरांचा समावेश आहे.

त्यांच्या या यशाबद्दल संभाजीनगरचे वैय्याकरणी श्री. नागेश अंकुश, साहित्य अकादमीचे नरेंद्र पाठक, शिक्षिका संमलेनाच्या अध्यक्षा श्रीम . आशा डांगे, भाषा व संस्कृती प्रतिष्ठानचे सुनील डोके, विख्यात चित्रकार व कादंबरीकार सरदार जाधव, हिंदी प्रतिष्ठानच्या प्रा. सविता लोंढे , पंजाब साहित्य अकादमीचे अध्यक्ष डॉ. सुखदेव सिरसा, सुनील जाधव, अजय महाराज बारस्कर आदि मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# मोफत शस्त्रक्रियेसाठी लाच! बिडकीन ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक जेरबंद

## एसीबीची सापळा कारवाई; सफाई कर्मचाऱ्याद्वारे १,२०० रुपये स्वीकारताना रंगेहात पकडले

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** शासकीय योजनेअंतर्गत मोफत होणाऱ्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी लाच मागणाऱ्या बिडकीन येथील ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षकास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून अटक केली. या कारवाईत सफाई कर्मचाऱ्यालाही रंगेहात पकडण्यात आले.

या प्रकरणात डॉ. विजय बजरंग दळवी (वय ५८), वैद्यकीय अधीक्षक (वर्ग–१) व नारायण हरिश्चंद्र ब्राह्मणे (वय ३७), सफाई कर्मचारी यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

तक्रारदाराच्या बहिणीची कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून देण्यासाठी डॉ. दळवी यांनी सुरुवातीला ६ हजार रुपयांची लाच मागितली होती. शासकीय रुग्णालयात ही सेवा मोफत असतानाही लाच मागितल्याने तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली.

त्यानंतर तक्रारीची पडताळणी करताना पंचासमक्ष डॉ. दळवी यांनी १,२०० रुपयांची लाच मागणी करून ती स्वीकारण्याचे कबूल केले. ही रक्कम सफाई कर्मचारी नारायण ब्राह्मणे याच्याकडे देण्यास सांगण्यात आले. दि. ६ एप्रिल रोजी सापळा कारवाई दरम्यान नारायण ब्राह्मणे याने तक्रारदाराकडून १,२०० रुपये स्वीकारताच पथकाने त्याला रंगेहात पकडले, त्यानंतर डॉ. दळवी यांनाही ताब्यात घेण्यात आले. कारवाईदरम्यान आरोपींकडून लाच रक्कम व मोबाईल फोन जप्त करण्यात आले असून घरझडती सुरू आहे. दोघांविरोधात बिडकीन पोलीस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# आर्ट ऑफ लिव्हिंगतर्फे उन्हाळी सुट्टीमध्ये मुलांसाठी इंट्युशन प्रोग्रामचे आयोजन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** आर्ट ऑफ लिव्हिंगतर्फे शहरात मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी "इंट्युशन प्रोग्राम" म्हणजे अंतर्ज्ञान प्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आला असून, ५ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांसाठी हा उपक्रम नगर शहरात यापूर्वी झालेले आहेत आता उन्हाळी सुट्टीमध्ये अंतर्ज्ञान प्रक्रिया शिबीर विशेष ठरणार आहे. शांत व एकाग्र मनातून योग्य वेळी योग्य विचार निर्माण होण्याची क्षमता म्हणजे इंट्युशन किंवा अंतर्ज्ञान ( ) होय. सध्याच्या स्पर्धात्मक युगात मुलांमध्ये ही क्षमता विकसित करणे अत्यंत गरजेचे असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या प्रोग्रामसाठी महाराष्ट्र मध्ये ठीक ठिकाणी शिबीर घेणारे अनुभवी प्रशिक्षकांचे मार्गदर्शन लाभणार आहेत. कार्यक्रमामध्ये योग, प्राणायाम आणि सुदर्शन क्रिया यांच्या माध्यमातून मुलांची मानसिक एकाग्रता, स्मरणशक्ती आणि निर्णयक्षमता वाढवण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच मुलांना आवडणारे सांघिक खेळ, विविध उत्साहपूर्ण क्रियाकलाप यांचाही समावेश करण्यात आला आहे. हा इंट्युशन प्रोग्राम ११ ते १४ एप्रिल २०२६ दरम्यान आर्ट ऑफ लिव्हिंग ज्ञान क्षेत्र, गावंडे मळा, अहिल्यानगर येथे दररोज सायं. ४ ते ९ या वेळेत पार पडणार आहे. कार्यक्रमानंतर काही सत्रे ऑनलाइन पद्धतीनेही आयोजित केली जाणार आहेत.


या प्रशिक्षणाद्वारे मुलांमध्ये डोळ्यांवर पट्टी बांधून रंग किंवा वस्तू ओळखणे, फोटो मेमरी विकसित करणे, मोबाईलचा वापर कमी करणे यांसारख्या कौशल्यांचा विकास होतो, असा दावा आयोजकांनी केला आहे. यामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढून अभ्यासातील तणाव व भीती कमी होण्यास मदत होते. तसेच सर्जनशीलता, एकाग्रता आणि सकारात्मक विचारसरणी विकसित होऊन मुलांच्या व्यक्तिमत्त्वात लक्षणीय बदल घडतो, असे अनेक पालकांचे अनुभव आहेत.आजपर्यंत हजारो मुलांनी या प्रोग्रामचा लाभ घेतला असून, त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडल्याचे सांगितले जाते. त्यामुळे आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा प्रोग्राम उपयुक्त ठरणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी ९४२२२२०८७४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# साहित्य वाचनाने सृजनशील समाज घडतो – प्रा. राम शिंदे

## संतोष कानडे यांच्या 'पुस्तक भेट' उपक्रमाचे विधान परिषदेचे सभापती शिंदे यांच्याकडून कौतुक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ''साहित्य वाचनामुळे समाज अधिक सृजनशील, विचारशील आणि प्रगल्भ बनतो,'' असे प्रतिपादन विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले. ते अहिल्यानगर येथे एका कार्यक्रमानिमित्त आले असता सामाजिक कार्यकर्ते संतोष कानडे यांनी त्यांची भेट घेऊन त्यांना पुस्तक भेट देत आपल्या विविध सामाजिक उपक्रमांची सविस्तर माहिती दिली.



सामाजिक कार्यकर्ते संतोष कानडे गेल्या काही वर्षांपासून 'पुस्तक भेट' हा उपक्रम सातत्याने राबवत आहेत. या उपक्रमाअंतर्गत त्यांनी विविध शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक वाचनालये तसेच शालेय विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर पुस्तके भेट दिली आहेत.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणे आणि समाजात वाचन संस्कृती वाढवणे हा आहे. आजच्या डिजिटल युगात पुस्तकांपासून दूर जाणाऱ्या पिढीला पुन्हा वाचनाकडे वळवण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावत आहे. संतोष कानडे यांनी सांगितले की, वाढदिवस, राष्ट्रपुरुषांच्या जयंती, संविधान दिन तसेच विविध राष्ट्रीय दिनांच्या निमित्ताने लोक सहसा इतर वस्तू भेट देतात. मात्र, त्याऐवजी पुस्तक भेट देण्याची सवय लावल्यास समाजात सकारात्मक बदल घडू शकतो.

''पुस्तक हेच खरे ज्ञानाचे दार उघडणारे साधन आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या आनंदाच्या क्षणी पुस्तक भेट देण्याची परंपरा रुजवावी,'' असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्रा. राम शिंदे यांनी संतोष कानडे यांच्या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. त्यांनी म्हटले की, ''अशा प्रकारचे उपक्रम समाजाला योग्य दिशा देणारे आहेत. वाचन संस्कृती वाढवणे ही काळाची गरज आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विचारशक्ती वाढून एक सुदृढ आणि सृजनशील समाज घडू शकतो.'' आजच्या तंत्रज्ञानप्रधान जीवनशैलीत वाचनाची सवय कमी होत चालली आहे. अशा परिस्थितीत संतोष कानडे यांसारखे कार्यकर्ते समाजात वाचनाची जागृती निर्माण करत असून, त्यांचा हा प्रयत्न समाजासाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे स्पष्ट केले.

# गुरुदत्त भक्तीचा मंदिरात हभप राधाकृष्णजी महाराज यांची सदिच्छा भेट

## गुरु हे भक्तांना परमेश्वराशी एकरुप करतात – हभप राधाकृष्णजी महाराज

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ३ एप्रिल ते ९ एप्रिल या कालावधीत श्रीमद भागवत कथेचे दुपारी २ ते ६ यावेळी नंदनवन लॉन्स, न्यू टिळक रोड येथे रामनिवास सतीशचंद्र इंदाणी यांनी भक्तांसाठी कथेचे आयोजन केले आहे. जोधपूर येथील प.पू.गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांच्या रसाळ वाणीतून श्रीमद भागवत कथेचे निरूपण केले जात आहे. संत किसनगिरी नगर येथील गुरुदत्त भक्तीधाम येथे प.पू.गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांनी सदिच्छा भेट दिली असता देवगड देवस्थानचे महंत गुरुवर्य हभप भास्करगिरीजी महाराज यांनी त्यांचे स्वागत केले.याप्रसंगी संतांचा अनोखा मिलाप व प्रवचनाचा लाभ भक्तांनी घेतला.



यावेळी राधाकृष्णजी महाराज म्हणाले,गुरुदत्त भक्तीधाम मंदिराचा कळस जसा चमकदार आहे तसा मंदिराचा पाया ह भक्कम आहे.येथे सद्गुरू किसनगिरी बाबांची कृपा आहे असे दिसते.या मंदिरात आल्यानंतर देवगडच्या दत्त मंदिरात आल्यासारखेच वाटत आहे. मन प्रसन्न होते.देवगडच्या मंदिराची शिस्त,स्वच्छता व अनुशासन याचे दर्शन या गुरुदत्त भक्ती दाम मंदिरात झाले आहे. गुरु आपल्या जीवनात येतात,प्रत्येक जीवाला भगवंताची जोडण्यासाठी येत असतात.गुरु हे स्वतःला जोडण्यासाठी नाही तर परमेश्वराला भक्तांशी जोडण्यासाठी असतात.ज्या भक्तांवर सद्गुरुकृपा आहे.त्यांनाच भास्करगिरीजी बाबा यांच्यासारखे गुरु मिळतात.

श्री क्षेत्र देवगड येथे अधिकमास निमित्त दि.२१ मे ते २७ मे या कालावधीमध्ये ''विठ्ठल रस भक्ती महोत्सव'' चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये श्रीमद् भागवत कथा, कीर्तन तसेच नामदेव भक्ती,तुकाराम भक्ती, तसेच संतांच्या सानिध्यात कथा कीर्तन रस कुंभ होत आहे.याचा सर्व भक्तांनी लाभ घ्यावा.असे आवाहन हभप राधाकृष्णजी महाराजांनी केले आहे.

हभप भास्करगिरी जी महाराज म्हणाले,गुरुदत्त भक्तीधाम मंदिरात प.पू.गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांनी सदिच्छा भेट दिली हा दिवस सुवर्ण अक्षरांमध्ये लिहून ठेवण्यासारखा आहे. गुरु हे सर्वश्रेष्ठ आहे.गुरूप्रती नतमस्तक रहावे.देवाने संत भिन्न नाहीत.देवावर गुरूवर श्रद्धा ठेवा, धर्मावर निष्ठा बळकट करा,देव देश आणि धर्मासाठी कार्य करा. सद्गुरु हे भक्तिमार्ग सांगत असतात.निस्वार्थ भक्तीने परमेश्वराची प्राप्ती होते.भगवान श्री दत्तात्रय यांच्या कृपेने जीवन सफल होते. गुरुदत्त भक्तीधाम मंदिरात संत मिलनाने भाविक मंत्रमुग्ध झाले.याप्रसंगी पाईपलाईन रोड,किसनगिरी नगर परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सद्गुरु किसनगिरी बाबा नगर भक्त मंडळ व बन्सी महाराज मिठाईवाले यांनी परिश्रम घेतले.

# अस्मिता बॅनर्जी यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी पदवी प्रदान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** येथील आयएमएस रिसर्च सेंटरच्या विद्यार्थीनी कु. अस्मिता बॅनर्जी यांना नुकतीच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी (डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी) पदवी प्रदान करण्यात आली. यानिमित्ताने संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता यांच्या शुभहस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी संस्थेचे उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. प्रोणोती तेलोरे, प्रबंध मार्गदर्शक डॉ. ऋचा तांदुळवाडकर, रिसर्च सेंटरचे प्रमुख डॉ. राहुल



खंडेलवाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांनी अस्मिता यांच्या यशाचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

अस्मिता बॅनर्जी यांनी आपल्या प्रबंधासाठी '' पुणे जिल्ह्यातील ऑनलाइन शिक्षण सेवांबाबत ग्राहकांच्या वर्तनाचा अभ्यास'' हा विषय निवडला होता. या प्रबंधामध्ये ऑनलाईन अभ्यासक्रमांची रचना कशी करावी तसेच त्याचा विद्यार्थी, शासन आणि उद्योगक्षेत्राला अधिकाधिक कसा लाभ होऊ शकतो याविषयी सखोल अभ्यास करण्यात आला आहे.
या संशोधन कार्यासाठी त्यांना प्रबंध मार्गदर्शक डॉ. ऋचा तांदुळवाडकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच बाह्य परीक्षक म्हणून डॉ. सारंग भोला आणि डॉ. हेमंत काटोळे यांनी काम पाहिले.

### अहिल्यानगरच्या डॉक्टराचा आंतरराष्ट्रीय सन्मान

# डॉ. अतुल भांबळ यांना अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीकडून डॉक्टरेट

## गोव्याचे मुख्यमंत्री कामत यांच्याकडून सन्मान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील प्रख्यात वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. अतुल भांबळ यांना अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीकडून हॉस्पिटल मॅनेजमेंट या विषयात मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे अहिल्यानगर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

गोवा येथे पार पडलेल्या पदवीदान समारंभात गोव्याचे माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत यांच्या हस्ते डॉ. भांबळ यांना डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीचे डायरेक्टर अनिल कुमार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



डॉ. अतुल भांबळ हे अहिल्यानगर जिल्ह्यातील वांबोरी गावचे सुपुत्र असून, अत्यंत साध्या शेतकरी कुटुंबातून त्यांनी आपली वाटचाल सुरू केली. प्रचंड मेहनत, चिकाटी आणि सेवाभावी वृत्तीच्या जोरावर त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. हजारो उमेदवारांमधून निवड होऊन मिळवलेला हा सन्मान त्यांच्या गुणवत्तेची आणि कार्यक्षमता सिद्ध करणारा आहे.

विशेष म्हणजे, डॉ. भांबळ हे अर्धांगवायू (पॅरालिसिस)ग्रस्त रुग्णांसाठी मोफत उपचार देण्याचे कार्य सातत्याने करत आहेत. 'डॉक्टर कीट' या उपक्रमाच्या माध्यमातून त्यांनी शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील हजारो गरजू रुग्णांना निःस्वार्थ सेवा पुरवली आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे अनेक रुग्णांना नवसंजीवनी मिळाली आहे.

समाजासाठी अहोरात्र झटणाऱ्या आणि वैद्यकीय सेवेचे सामाजिक भान जपणाऱ्या डॉ. अतुल भांबळ यांना मिळालेला हा आंतरराष्ट्रीय सन्मान म्हणजे त्यांच्या कार्याची जागतिक स्तरावर झालेली दखल मानली जात आहे. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या वतीने पै. नाना डोंगरे यांचा सन्मान

## सामाजिक कार्याची दखल; शिक्षक सोसायटीकडून सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते तथा सोसायटीचे सभासद पै. नाना डोंगरे यांचा सन्मान करण्यात आला. जळगाव येथे तुबा नाज हेल्प मल्टीपर्पज सोसायटीच्या वतीने 'पंडित जवाहरलाल नेहरू जीवन गौरव पुरस्कार' मिळाल्याबद्दल हा उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते पै. डोंगरे यांचा सत्कार करण्यात आला.

या सत्कार सोहळ्याप्रसंगी महापौर ज्योतीताई गाडे, चेअरमन आप्पासाहेब शिंदे, व्हाईस चेअरमन अर्जुन वाळके, माजी प्राचार्य खासेराव शितोळे, संचालक बाबासाहेब बोडखे, सुनील दानवे, महेंद्र हिंगे, सुरज घाटविसावे, वैशाली दारकुंडे, वर्षा खिलारी, राजेंद्र कोतकर, उमेश गुंजाळ,




सोसायटीचे सचिव स्वप्निल इथापे यांच्यासह चंद्रकांत पवार, निळकंठ वाघमारे अनेक मान्यवर उपस्थित होते.

सामाजिक, शैक्षणिक, साहित्य, सांस्कृतिक आणि पर्यावरण संवर्धन या विविध क्षेत्रांमध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन पै. नाना डोंगरे यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य म्हणून त्यांनी नगर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात ग्रामीण भागात सातत्याने सामाजिक उपक्रम राबवले आहेत. संस्थेच्या माध्यमातून त्यांनी शिक्षण, कला, क्रीडा, साहित्य आणि धार्मिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले असून, अनेक युवकांना प्रेरणा देणारे कार्य उभारले असल्याचे उपस्थितांनी कौतुक केले.

# गोदावरी लुटली जातेय, प्रशासन गप्प! पैठणमध्ये वाळू माफियांचा उघड उच्छाद

## आयटीआय तुळजापूर, नवगाव, वडवाळी कट परिसरात अवैध उपसा; महसूल–पोलीस यंत्रणा निष्क्रिय?



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण तालुक्यात अवैध वाळू उपशाने कळस गाठला असून, गोदावरी नदीचे पात्र अक्षरशः पोखरून काढले जात आहे. आयटीआय तुळजापूर, नवगाव व वडवाळी कट परिसरात दिवस–रात्र सुरू असलेल्या या बेकायदेशीर धंद्यामुळे पर्यावरण धोक्यात आले आहे. मात्र, संबंधित प्रशासन झोपेचे सोंग घेत असल्याचा संतप्त आरोप नागरिकांकडून होत आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, मोठ्या यंत्रसामग्रीच्या सहाय्याने नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा सुरू आहे. यामुळे नदीचे स्वरूप बदलत असून भविष्यात पूरस्थिती, भूजल पातळी घट आणि परिसरातील शेतीवर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

''कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे हा खेळ?'' माफियांना पाठीशी कोण? नागरिकांचा थेट सवाल

अवैध वाळू उपसा इतक्या मोठ्या प्रमाणात सुरू असताना महसूल व पोलिस प्रशासन पूर्णपणे निष्क्रिय का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. तहसीलदार कार्यालयाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने माफियांचे मनोबल वाढले असल्याचे दिसून येत आहे.

नदीचा जीव धोक्यात; पर्यावरणाचा समतोल ढासळण्याची भीती

तज्ज्ञांचा इशारा; तातडीने कारवाईची गरज

गोदावरी पात्रातील सततच्या उत्खननामुळे नदी खोल होत असून नैसर्गिक प्रवाह बिघडत आहे. याचा दीर्घकालीन परिणाम संपूर्ण परिसरावर होऊ शकतो, असा इशारा पर्यावरण अभ्यासकांकडून देण्यात येत आहे.

नागरिकांचा इशारा

अवैध वाळू उपसा तात्काळ बंद करावा संबंधित माफियांवर कठोर कारवाई करावी प्रशासनाने जबाबदारी निश्चित करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# विश्व नवकार महामंत्र दिनानिमित्त ९ एप्रिल रोजी नगरमध्ये विशेष जाप कार्यक्रम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो)च्या वतीने संपूर्ण भारतासह आंतरराष्ट्रीय स्तरावर गुरूवार दि. ९ एप्रिल २०२६ रोजी विश्व नवकार महामंत्र दिवस भव्य स्वरूपात साजरा करण्यात येणार आहे. नगर शहरात यादिवशी धार्मिक परीक्षा बोर्ड येथे सकाळी ७.०२ ते ९.३६ यावेळेत नवकार जाप केला जाणार आहे. पुरूषांनी पांढरे व महिलांनी लाल वेशभूषा परिधान करून सहभागी व्हावे. यावेळी धार्मिक गीत संगीत, सांस्कृतिक कार्यक्रमही रंगणार आहेत. या विश्वव्यापी उपक्रमात ७४ जितो चॅप्टर्स, ९ झोन, ३१ आंतरराष्ट्रीय चॅप्टर्स, १०८ देश, १०८ पेक्षा अधिक धार्मिक अनुष्ठान स्थळे, ६ हजारांहून अधिक जैन देरासर, उपाश्रय, स्थानकांतून भाविक सहभागी होणार आहेत.

विश्व नवकार महामंत्र दिवस

JITO AHILYANAGAR

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दिल्ली येथील कार्यक्रमात सहभागी होऊन लाईव्ह संबोधित करणार आहेत. एलईडी स्क्रीनच्या माध्यमातून सामूहिक नवकार महामंत्र जपाचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे, अशी माहिती जितो अहिल्यानगरचे चेअरमन आलोक मुनोत व सेक्रेटरी तुषार कर्नावट यांनी दिली.

आनंदधाम येथे साधू साध्वीजींच्या पावन सान्निध्यात हा कार्यक्रम होणार आहे. प्रसिद्ध गायक पवन नाईक व सहकारी नवकार नाद तसेच धार्मिक गीते सादर करतील. कार्यक्रमानंतर केशर गुलाब मंगल कार्यालय येथे अभिजीत विनोद गांधी (एलाईट) यांच्यावतीने सर्वांसाठी गौतम प्रसादीची व्यवस्था करण्यात आली आहे.

या दिव्य आयोजनाचा उद्देश नवकार महामंत्राच्या अद्भुत शक्तीचा प्रचार व प्रसार करणे आणि अधिकाधिक लोकांना या आध्यात्मिक साधनेसाठी प्रेरित करणे हा आहे. प्रत्येकाने आपल्या शहरातील, गावातील प्रमुख धार्मिक स्थळे, समाज, प्रतिष्ठित व्यक्ती आणि श्रद्धाळूंना या महान कार्यात सहभागी घ्यावे. स्थानिक पातळीवर जास्तीत जास्त भाविकांनी नजीकच्या स्थानकात किंवा घरी बसूनही माळ जपावी.

देशातील दिग्गज राजकारणी, मोठे उद्योजक, बॉलिवूड स्टार, दिग्गज खेळाडू, सेलिब्रिटींही यात सहभागी होणार आहेत. अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे की नवकार महामंत्राची शक्ती आणि महत्त्व आज जागतिक स्तरावर मान्यता मिळवत आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमात अधिकाधिक भाविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन जितो लेंडीज विंग चेअरमन संगिता मुथियान, सेक्रेटरी अंशु मुनोत, युथ विंग चेअरमन चेतन भंडारी, सेक्रेटरी यश भंडारी यांनी केले आहे.

# नेप्ती येथे निःशुल्क नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती येथे राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमांतर्गत समता फाउंडेशन, एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, पुणे व ग्रामपंचायत कार्यालय, नेप्ती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या निःशुल्क नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत पार पडलेल्या या शिबिरात असंख्य रुग्णांनी आपली नेत्र तपासणी करून घेतली.

समता दिव्य ज्योत अभियानांतर्गत आयोजित या शिबिरामध्ये तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णांची सखोल तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान अनेक रुग्णांमध्ये मोतीबिंदूचे निदान झाले असून त्यांना पुढील शस्त्रक्रियेसाठी पुणे येथील एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयात निःशुल्क उपचारासाठी पाठविण्यात येणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले यांनी दिली.
या शिबिराची विशेष बाब म्हणजे मोतीबिंदू शस्त्रक्रिया पूर्णपणे निःशुल्क करण्यात येणार असून रुग्णांची ने–आण,



राहण्याची व जेवणाची संपूर्ण व्यवस्था आयोजकांच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना काळे चष्मे देखील मोफत देण्यात येणार आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील गरजू नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनात अनेकजण आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. विशेषतः डोळ्यांच्या आजारांकडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात गंभीर परिणामांना सामोरे जावे लागते. अशा निःशुल्क शिबिरांमुळे सर्वसामान्यांना वेळेत तपासणी व योग्य उपचाराची संधी मिळते, ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे.'' अंधत्व निर्मूलनासाठी जनजागृती व सेवाभाव आवश्यक आहे असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते जमीर सय्यद यांनी केले आहे.

पुढे बोलताना सय्यद म्हणाले की, समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आरोग्य सेवा पोहोचविणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. समता फाउंडेशनसारख्या संस्थांच्या माध्यमातून होत असलेले कार्य अत्यंत स्तुत्य असून अंधत्व निर्मूलनासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज आहे. नागरिकांनीही या शिबिरांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा,'' असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी सरपंच संजय अशोक जपकर, आरोग्य सेवक हर्षल बनसोडे ,माजी उपसरपंच संजय आसाराम जपकर, सामाजिक कार्यकर्ते जमीर सय्यद, रामदास फुले, माजी सरपंच सुधाकर कदम, बाबासाहेब रावळे, अशोक जपकर, मंदाबाई राऊत, रावसाहेब साळुंखे, शंकर बेल्हेकर, रुस्काना सय्यद, मुमताज सय्यद, अतुल जपकर, सविता अल्हाट, सोनाबाई जपकर, सबाजी कांडेकर, रावसाहेब कांडेकर, मच्छिंद्र होळकर, सुलोचना पवार, तात्याराम पवार व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.